# धुळे महानगरपालिका

जा.क्र./धुमपा/आयुक्त कार्यालय/७५
दिनांक :- १२/०५/२०२६

**विषय** - महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागांवरील (open space) अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत.

**जाहीर सूचना**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका मालकीच्या अनेक खुल्या जागांवर अतिक्रमण केल्याचे/अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे केल्याचे निदर्शनास येत आहे व याबाबत अनेक तक्रारीही प्राप्त होत आहेत.

या जाहीर सूचनेव्दारे अशा सर्व संबंधितांना महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागांवरील अतिक्रमणे/अतिक्रमित बांधकामे ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत काढून घेण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.

या जाहीर सूचनेच्या प्रसिध्दीकरणापासून ०७ दिवसांच्या आत सर्व संबंधितांनी अशी अतिक्रमणे/अतिक्रमित बांधकामे स्वत:हून काढून घ्यावीत/निष्कासित करावीत. अथवा अशा सर्व अतिक्रमणधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात येतील व अशी अतिक्रमणे/अतिक्रमित बांधकामे महानगरपालिकेच्या वतीने निष्कासित करण्यात येऊन त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल.

**दिनांक : - १२/०५/२०२६**
**ठिकाण :- धुळे महानगरपालिका.**

**नितीन कापडणीस**
**आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**